## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १९२/२०१४ मधील नि. ०५ वर आदेश

सदरचा दावा वादीने प्रतिवादीं विरूध्द सरस निरस वाटपाकरीता, खरेदीखत रद्दबातल करुन मिळण्याकरीता व मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. या अर्जाद्वारे वादीने प्रतिवादीं विरूध्द दावा मिळकत कुणासही विक्री करु नये अगर दावा मिळकतीत अन्य कुठल्याही प्रकारे त्रयस्थ इसमाचा हक्कसंबंध निर्माण करु नये असा कायम मनाई हुकुम मिळावा अशी मागणी केली आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे :

वादी हा प्रतिवादी क्रमांक १, ३ ते १० चा भाउ असुन वादी, प्रतिवादी क्रमांक १, ३ ते ७ हे कै.वासुदेव नाना पाटील यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्रमांक ८ ते १० हे वादीची मयत बहिण निर्मला मोरे हिचे वारस आहेत. वादी, प्रतिवादी क्रमांक १ ते १० यांची माहिम येथील सर्व्हे नंबर ८२७/५ क्षेत्र ०-६९-८ हे.आर ही शेतजमिन सामाईक मालकीची व कब्जेवहीवाटीत आहे. (यापुढे सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधण्यात येईल.)

३. वादीचे कथन असे आहे की, वादी व प्रतिवादी क्रमांक १, ३ ते ७ यांचे वडील व प्रतिवादी नंबर ८ ते १० यांचे आजोबा वासुदेव नाना पाटील हे होते. वासुदेव हे दिनांक २५/०१/२००८ रोजी मयत झाले व त्यांची पत्नी दिनांक २४/०१/२००७ रोजी मयत झाली. वासुदेव यांच्या हयातीत त्यांनी मौजे माहिम पालघर येथे खरेदीखताने व कुळकायद्याने अनेक मिळकती संपादन केल्या होत्या. त्या जमिनींचे त्यांच्या वारसांमध्ये सरसनिरस वाटप झाले नव्हते. वादीचे आजोबा नाना पाटील यांच्या कब्जात दावा मिळकत ही बाबजी दिनकर श्रृंगारपुरे यांचा कुळ म्हणुन

होती. वादीचे वडील वासुदेव व काका काळु नाना हे अज्ञान असल्याने त्यांच्या तर्फे अ.पा.क.म्हणुन वादी व प्रतिवादी नंबर १, ३ ते ७ यांची आजी व प्रतिवादी नंबर ८ ते १० यांची पणजी सखु हिने दिनांक २४/११/१९३७ चे नोंदणीकृत खरेदीखत क्रमांक ६३४ ने कै.वासदेव व कै.नाना यांच्या कुटुंबाकरीता खरेदी करुन कब्जात घेतले. काळु नाना पाटील यांचे कोणीही वारस नव्हते. त्यांच्या मृत्यु पश्चात त्यांचे नाव महसुल दफतरी कमी करण्यात आले. कै.वासुदेव यांनी त्यांच्या हयातीत दिनांक २१/०६/२००७ रोजी ईच्छापत्र लिहुन ठेवले होते. सदर ईच्छापत्रानुसार त्याने दावा मिळकतीची त्यांच्या मुलांमध्ये विभागणी केली होती.

४. वादीने महसुल दफतरी त्यांची नावे ईच्छपत्राप्रमाणे नमुद करण्याबाबत अर्ज केला असता प्रतिवादी व वासुदेव यांच्या इतर वारसांनी हरकती उपस्थित केल्या. प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्यावरुन वासुदेव पाटील यांनी त्यांच्या हयातीत दिनांक १७/०२/२००६ रोजी खरेदीखताने प्रतिवादी क्रमांक १ ला विकत दिल्याचे आढळुन आले. वादी पुढे असे कथन करतो की, प्रतिवादी यांनी कै.वासुदेव यांच्या वृध्दत्वाचा गैरफायदा घेउन त्यांची फसवणुक करुन दावा मिळकतीचे खरेदीखत करुन घेतले. तसेच खरेदीखत करतेवेळी वादीची संमती घेण्यात आली नव्हती अथवा जाहीर नोटीस देण्यात आली नव्हती. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचा हक्कसंबंध निर्माण केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल करीता दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीत प्रतिवादी क्रमांक १ ने त्रयस्थ हक्कसंबंध निर्माण करु नये अशी अंतरीम मागणी केली आहे.

५. प्रतिवादी क्रमांक १ ने हजर होवुन नि.क्र.३९ प्रमाणे दाव्यास कैफियत दिली. प्रतिवादी क्रमांक २ ने हजर होवुन नि.क्र.४१ प्रमाणे

दाव्यास कैफियत दिली. प्रतिवादी क्रमांक ७ ते १० ने हजर होवुन नि.क्र. ४३ प्रमाणे दाव्यास कैफियत दिली आणि प्रतिवादी क्रमांक ३ व ५ यांनी नि.४५ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक ७ ते १० यांनी दाखल केलेली कैफियत स्विकारली. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दाव्यातील बहुतांश कथने नाकारली. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी मुख्यतः कै.वासुदेव यांनी तयार केलेल्या ईच्छापत्राची बाब प्रकर्षाने नाकारली. प्रतिवादी क्रमांक १ हिने तिच्या अधिकच्या कथनात असे कथन केले आहे की, दावा मिळकत प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दिनांक १७/०२/२००६ रोजी खरेदीखताने वासुदेव पाटील यांच्याकडुन मोबदला घेउन खरेदी केली आहे. त्यामुळे दिनांक २१/०६/२००७ रोजीचे ईच्छापत्र तयार करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ असे कथन करते की, दिनांक २१/०६/२००७ रोजीचे ईच्छापत्र हे बनावट व बोगस आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी मोबदला देवुन दावा मिळकतीचे खरेदीखत करुन घेतले आहे. दावा मिळकत आजमितीला प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या ताब्यात असुन ते त्याचा उपभोग घेत आहे. केवळ त्रास देण्याच्या हेतुने वादीने सदर खोटा दावा दाखल केल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे. करीता प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादींचा निशाणी ०५ चा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

६. सदर अर्ज निकाली काढण्याकरीता केवळ प्रतिवादी क्रमांक १ व २ यांची कैफियत विचारार्थ घेण्यात आली आहे कारण वादीची केवळ प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या विरुध्द अर्जात मागणी असल्याचे दिसुन येते. करीता दोन्ही बाजूंचे कथने व त्यांनी दाखल केलेले कागदपत्रे पाहता खालील मुददे विचारार्थ घेतले आहे. या मुद्दयांवरील निष्कर्ष पुढील कारणमिमांसा आधारे नमूद केले आहेत.

| <u>मुद्दे</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १) दाव्यातील परिस्थिती सकृत दर्शनी वादीच्या बाजूने आहे असे वादींनी शाबित केले आहे काय ? | ... | होकारार्थी |
| २) न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ... | होकारार्थी |
| ३) मनाई हूकम न दिल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | ... | होकारार्थी |
| ४) आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क. १ ते ३ साठी निष्कर्ष</u>

७. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे आदेश करतांना दोन्ही बाजूनी केलेली कथने व दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता येतील. त्यासाठी दोन्ही बाजूंनी दाखल केलेल्या कागदपत्रांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

**<u>वादीने दाखल केलेले दस्त पुढीलप्रमाणे-</u>**

१) दि.२४/११/१९३७ चे फरोक्तखत
२) दावा मिळकतीचा सातबारा उतारा
३) फेरफार क्रमांक ३९८४, १८०१, ६१७८, २३६४०, ९००८, २६८२६, ८४७० चे उतारे
४) दुयम निबंधक यांच्याकडे फि जमा केलेली पावती.
५) दुयम निबंधक पालघर यांना दिलेले पत्र.
६) दिनांक १७/०२/२००६ रोजीचे खरेदीखत.
७) कै.वासुदेव यांच्या खात्याचे पासबुकची प्रत.
८) दावा मिळकतीची छायाचित्रे.
९) वादीने वेगवेगळया महसुल खात्यास केलेले तक्रारी अर्ज.

१०) जाहीर नोटीस.
११) प्रतिवादी क्रमांक १ ने तहसिलदार पालघर यांच्याकड दिलेले लेखी म्हणणे.
१२) ग्रामविकास अधिकारी, माहीम यांच्यातर्फे माहीतीच्या अधिकाराखाली पुरविलेल्या कागदपत्रांचा संच.
१३) नगररचनाकार यांनी दिलेली परवानगी.
१४) प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी लिहुन दिलेला इंडेमनिटी बॉन्डची प्रत.
१५) बिनशेती परवानगी.
१६) दावा मिळकतीचा मोजणी नकाशा व ले-आउट नकाशा.
१७) रे.मु.नं.१७१/२०१५ मधील नि.क्र. १ ची नक्कल.

**प्रतिवादीने दाखल केलेले दस्त पुढीलप्रमाणे -**

१) रे.मु.नं.८३/२०१३ च्या दाव्याची प्रत.
२) रे.मु.नं.८३/२०१३ मधील नि.७७, ७८ व ७९ वरील प्रमाणित अर्ज.
३) दिनांक ०८/०१/२०१६, दिनांक ०६/०१/२०१६, दिनांक २७/०१/२०१६ व दिनांक २०/०१/२०१६ रोजीच्या एकूण चार जाहीर नोटीस.
४) दावा मिळकतीचे सातबारे उतारे.
५) फेरफार ३०५४२ व २३८२६ ची प्रत
६) बिनशेती आदेशाची प्रत.
७) ग्रामपंचायत कार्यालय माहीम यांनी दिलेल्या बांधकाम परवान्याची प्रत व ना-हरकत दाखल्याची प्रत.

८. वादीतर्फे विधीज्ञ श्री आर. एस. ठाकूर व प्रतिवादी क्रमांक १ तर्फे विधीज्ञ श्री पाल व प्रतिवादी क्रमांक २ तर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. मोगरे यांनी युक्तिवाद केला. वादी चे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक मिळकत असून दिनांक २४/११/१९३७ रोजीच्या खरेदीखताप्रमाणे कै. वासुदेव व कै. नाना यांनी त्यांचे कुटुंबाकरीता खरेदी करून कब्जात घेतली. त्याच प्रमाणे दिनांक २१/०६/२००७ रोजीच्या कै. वासुदेव यांचे इच्छापत्रानुसार दावा मिळकत ही त्यांचे प्रत्येक मुलीला व प्रतिवादी क्रमांक १ हिला वाटून दिली. मात्र महसुल दप्तरी नाव नोंदविते वेळी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी हरकती

उपस्थित केल्या. त्यावेळेस वादीस असे समजले की, दिनांक १७/०२/२००६ रोजी कै. वासुदेव नाना पाटील यांनी सदर दावा मिळकत ही खरेदीखताने प्रतिवादी क्रमांक १ हिला मोबदला स्वीकारून विकत दिली. या करीता वादी विशेषत: दिनांक २४/११/१९३७ चे खरेदीखतावर विसंबून राहिले. सदर खरेदी खताचे अवलोकन केले असता दावा मिळकत बाबाजी दिनकर शृंगारपुरे यांचेकडून वासुदेव नाना पाटील व काळू नाना पाटील यांचे तर्फे अज्ञान पालनकर्ता म्हणून त्यांची आई सखु हिने खरेदी केल्याचे दिसून येते. तसेच फेरफार क्रमांक ३९८४ चे अवलोकन केले असता दावा मिळकत वासुदेव व काळू नाना भंडारी यांचे नावे नमूद असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच फेरफार क्रमांक २३६४० चे अवलोकन केले असता काशिनाथ उर्फ काळू नाना पाटील (भंडारी) हे दिनांक २१/०४/२००९ रोजी मयत असून त्यांनी पत्नी यमुना काशिनाथ पाटील हिचे नाव दावामिळकतीवर वारस म्हणून लागल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे वासुदेव नाना भंडारी व यमुना काशिनाथ पाटील यांना दिनांक १७/०२/२००६ रोजीच्या खरेदी खताने प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना विकत दिल्याची नोंद फेरफार क्रमांक २३८२६ प्रमाणे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे सदर दावामिळकत ही सामाईक मिळकत असून सदर मिळकतीवर वादीचा अविभाज्य हिस्सा आहे. मात्र प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दावा मिळकतीत त्रयस्त इसमांचा हक्क संबंध निर्माण केल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल.

९. यात काही शंका नाही की प्रथमदर्शनी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांची नावे वर उल्लेखीत खरेदीखता वरून दावामिळकतीसंबंधी महसुल दप्तरी दिसून येतात. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी कै. वासुदेव व यमुना यांचे वृध्दत्वाचा गैरफायदा घेवून सदर दावामिळकत ही खरेदीखत करून घेतली आहे. वादीने वेळोवेळी वेगवेगळया कार्यालयास अर्ज करून

तक्रारी केल्या. त्याच प्रमाणे दिनांक २६/१२/२०११ रोजी प्रतिवादी क्रमांक १ हिने तहसिलदार पालघर यांचेकडे अर्ज करून वादींनी केलेल्या तक्रारी अर्जास विरोध केला. त्याचप्रमाणे दावा मिळकत ही बिनशेती करून घेवून त्यामध्ये बांधकाम सुरू केले. सदर बांधकामास संबंधीत ग्रामपंचायतीचे ना हरकत दाखला ही मिळविला. प्रथमदर्शनी असे दिसून येते की, दावामिळकत ही कै. वासुदेव हिच्या आईने म्हणजेच सखु हिने कै. वासुदेव व कै. काळु नाना तर्फे अज्ञान पालन कर्ता म्हणून बाबजी शृंगारपुरे यांचे कुळ म्हणून कब्जात घेतली. सदर दावामिळकत ही कुटुंबाकरीता कब्जात घेण्यात आली होती. परंतु असे जरी असले तरी दाव्याचे प्रथमदर्शनी दप्तर पाहता दिनांक २१/०६/२००७ रोजी कै. वासुदेव यांनी इच्छापत्र करून दावामिळकत ही त्यांचे प्रत्येक मुलीला व प्रतिवादी क्रमांक १ हिला वाटून दिली. अशा परिस्थित असे प्रथमदर्शनी दिसून येते की दावामिळकत ही प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचे कब्जात आहे. परंतु दिनांक १७/०२/२००६ रोजीच्या खरेदी खत व दिनांक २१/०६/२००७ रोजीचे इच्छापत्र यांचा एकत्रीत विचार करता नेमका कोणता दस्त विसंबून नेमका काय आदेश करावा हा पुराव्याचा भाग आहे. अशा परिस्थित वादीच्या म्हणण्याप्रमाणे जर प्रतिवादींनी त्रयस्त इसमांचा हक्क निर्माण केला तर वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल व विविध प्रकरणे दाखल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दाव्यामधील कथने, प्रतिवादींचे म्हणणे व दोन्ही बाजूंनी दाखल केलेल्या दस्तांचा पुरेपुर विचार करता असे प्रथमदर्शनी दिसुन येते की जरी दावामिळकत ही प्रतिवादींचे कब्जात असली तरी ही वादीचा दावामिळकतीमध्ये प्रथमदर्शनी हक्क असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीत वादीचा हक्क व दावा दाखल करण्याचा मुळ कारण गृहीत धरून वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल झुकलेला आहे असे दिसून येते. वादीची तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी मान्य करून

प्रतिवादी विरूध्द दावामिळकतीत त्रयस्त व्यक्तिचा हक्क निर्माण न करण्याचा आदेश दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही व तसे न केल्यास वादींचे न भरून येणारे नुकसान होईल. अशा परिस्थितीत वरील कारणामुळे, दाव्यातील परिस्थिती व न्यायाचा समतोल प्रतिवादींच्या बाजूने नाही असा अनुमान काढता येईल. या वरून मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क. ४ साठी निष्कर्ष

१०. वरील तिन्ही मुददयांचे होकारार्थी नष्कर्षामुळे मुददा क्रमांक ४ चे निष्कर्षाबाबत खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## -: आदेश :-

१) वादीचा नि. ०५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादींनी, त्यांचे नातेवाईक, कुळमुखत्यार किंवा त्यांचे मार्फत इतर कोणाही मार्फत त्यांचे विरूध्द दावामिळकती संबंधी दाव्याचा निकाल लागे पर्यंत दावामिळत कोणासही विकू नये अथवा त्रयस्थ व्यक्तिचा हक्क संबंध निर्माण करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम पारीत करण्यात येतो.

३) दोन्ही पक्षांनी याची नोंद घ्यावी.

४) खर्चाबाबत आदेश मुळ दाव्यात.

पालघर.
दिनांक : ३१/०३/२०१६

**(विजय एच. चव्हाण)**
२रे दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पालघर.